# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०३–२०१०/ दिनांक :

सौं. रतन रोहित पटेकरी,
शिक्षक सोसायटी, आसरानगर, सि.स.नं. १७७०३/३,
इचलकरंजी, ता. हातणकंगले, जि. कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
अ उप विभागीय कार्यालय, इचलकरंजी — विरूध्द पक्षकार

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. रतन रोहित पटेकरी, इचलकरंजी यांनी अनुसूचि अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००५ चे नियम ६.४ व ६.१० नुसार मंचाकडे वितरण कंपनीविरुध्द दि. ६.५.२०१० ला तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार ह्या वितरण कंपनीच्या ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्र. २५०६४३०५४४१४ आहे. परिशिष्ट अ सोबत जोडलेल्या निवेदनानुसार त्यांनी प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे क्ष फॉर्ममध्ये दि. २४.२.२०१० ला तक्रार दाखल केली.

त्यांनी नवीन बांधकामाचे वेळेस नवीन वीज कनेक्शन घेतले होते. जोडणीनंतर येणारी बीले घरगुती दराप्रमाणे येण्याऐवजी टेंपररी तथा व्यापारी दराने येत असल्याचे लक्षांत आल्यानंतर त्यांनी दि १२.३.२००९ रोजी तसे वि.प.ला पत्राने कळविले. त्यांनी दिलेली बीले भरली आहेत त्यामुळे घरगुती दराने आकारणी होवून जादा भरलेली रक्कम परत मिळावी. तसेच १२.३.२००९ ला कळवून व मागणी करुनही बिलात योग्य ते फेरफार केला नाही, त्यामुळे संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी अशी मंचास विनंती केली आहे. त्यांनी २४.२.२०१० च्या अर्जात वि.प.चे परिपत्रक क्र. ८८ दि. २६.९.२००८ चा आधार घेवून बिलाची दुरुस्ती व्यापारी ऐवजी घरगुती दराने करुन मिळावी अशी मागणी केली, दि. १२.३.२००९ च्या अर्जात वि.प. ला तशी विनंती केली आहे.

वि.प.चे नोडल ऑफीसर, कोल्हापूर यांनी आपल्या दि. २५.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार व कंपनीच्या नियमाप्रमाणेL.T. VII बांधकामाप्रमाणे बील देण्यात आले आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ग्राहकास जून २००९ पसून घरगुती दराप्रमाणे आकारणी केली आहे. परिपत्रक क्र. ८८ नुसार जुन्या घराची दुरुस्ती अथवा बदल करायचे असेल म्हणजे जुने कनेक्शन अस्तित्वात असेल अशाच ग्राहकांसाठी सदरचा लाभ देणेत येतो. तक्रारदार यांना सदर परिपत्रकाचा लाभ देता येणार नाही असे आदेश कक्षाने दिले आहेत.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ९.६.२०१० रोजी झाली. तक्रारदारांचे प्रतिनिधी रोहित शंकरराव पटेकरी हजर. तक्रारदार हजर. वि.प.तर्फे श्री. राठी, उप कार्यकारी अभियंता, श्री. कोळेकर, विभागीय लेखापाल व श्री. पी.एम. पाटील, सहाय्यक लेखापाल उपस्थित. तक्रारदार प्रतिनिधी यांनी सांगितले की, दि. १.८.२००८ ला वि.प.कडे अर्ज करुन बांधकामासाठी नवीन वीज जोडणी मंजूर करुन घेतली. वि.प.ने बीले दिली त्याप्रमाणे बीले भरली आहेत. दि. १२.३.२००९ ला अर्ज करुन परिपत्रक क्र. ८८ दि. २६.९.२००८ चा फायदा मिळावा व भरलेली रक्कम परत मिळावी अशी मागणी केली. या उलट, वि.प.चे अधिकारी श्री. राठी, उप कार्यकारी अभियंता यांनी मंचासमोर असे सांगितले की, परिपत्रक क्र. ८८ चा फायदा तक्रारदार यांना देता येणार नाही, कारण त्या परिपत्रकानुसार जुन्या घराची दुरुस्ती अथवा बदल करायचे असेल म्हणजे जुने कनेक्शन अस्तित्वात असेल अशाच ग्राहकांसाठी सदरचा लाभ देणेत येतो. तक्रारदारांचे बांधाकाम पूर्ण झाल्यानंतर त्यांना जून २००९ पासून घरगुती दराने आकारणी केली आहे

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना घराने दराने आकारणी करुन जादा भरलेली रक्कम परत देणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी परिशिष्ट अ सोबत जोडलेल्या निवेदनात अंतर्गत कक्षाच्या कामकाज पध्दतीबद्दल जोरदार आक्षेप घेतला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार अंतर्गत्र क़क्षाने त्यांना स्वत:ला किंवा प्रतिनिधीस सुनावणीसाठी बोलवले नाही अथवा एकतर्फी आदेश झाला असल्यास तोही त्यांना मिळाला नाही ही गोष्ट त्यांचेवर अन्यायकारक आहे. त्यामुळे त्यांनी ६.५.२०१० रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे आदेश दि. २५.५.२०१० रोजी पारित झाले आहेत. त्यामुळे तक्रारीत तथ्य आहे. असो.

वि.प.चे उप कार्यकारी अभियंता, अ उप विभाग इचलकरंजी यांनी आपल्या दि. ८.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी नवीन बांधकामा करिता दि. १.८.२००८ रोजी नवीन विद्युत कनेक्शन घेतलेले आहे व त्यांच्या मागणीनुसार व कंपनीच्या नियमप्रमाणे त्यांना L.T. VII बांधकामाप्रमाणे बिलींग केले होते. ग्राहकाने चाचणी अहवाल दि. १०.६.२००९ रोजी दिल्यानंतर जून २००९ पासून घरगुती दराने आकारणी केली आहे. ग्राहकाने बांधकामा करिता नवीन वीज कनेक्शन घेतले असल्याने त्यांना त्यांच्या मागणीनुसार मागील फरक देता येणार नाही असे म्हटले आहे.

वि.प.च्या तोंडी कथनानुसार व दि. ८.६.२०१० च्या लेखी अहवाला सोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन फॉर्म डी १ नुसार वीज संच मांडणीची चाचणी दि. १०.६.२००९ रोजी घेतल्याचे दिसते. त्यानुसार बांधकामानंतर घरगुती दराने बिलींग होणेबात दि. १२.६.२००९ ला तसा अर्ज दिल्याचे दिसते. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रथमत: दि. १२.६.२००९ रोजी ग्राहकाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. घरगुती दराने आकारणी करण्यात येत आहे. त्यामुळे तक्रारीसोबतच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे दि. १२.३.२००९ रोजी पत्राने कळविले हे संयुक्तिक वाटते. तक्रारदाराने मूळ अर्ज दि. २४.२.२०१० सोबतच्या अर्जात वि.प.च्या परिपत्रक क्र. ८८ दि. २६.९.२००८ चा आपल्या मागणी पुष्टयर्थ हवाला दिला आहे. वि.प.ने परिपत्रक क्र. ८८ ची प्रत मंचासमोर उपलब्ध करुन दिली आहे.

Commercial Circular No. 88

Sub :- Provisions of Clarificatory Order dated 12th Sept.2008 in the matter of the deailed Tariff Order of MERC dated 20th June, 2008

Ref :- 1) Commercial Circlar No. 81 dated 07th Sept.2008
2) Letter No. MERC/TRF/Case No. 72 of 2007/1841 dated 17.9.2008

The Commission also directs MSEDCL to ensure that the clarifications given in this Order are implemented with effect from June 1, 2008 and the consumers' bills are revised accordingly.

Point No. 2 : Applicability of LT VII Temporary Tariff for HT and LT Construction activity

The Commission has clarified on this issue that the above stated applicability for LT VII – Temporary Connections was not intended to be applied to L.T. consumers who are renovating or undertaking minor construction activity at their existing premises.

The Commission hence, clarifies that any L.T. consumer, having consumption uto 500 units per month, and who undertakes construction or renovation activity in his existing premises, does not require any separate temporary connection and this consumer should be billed at his existing tariff rate.

यावरुन तक्रारदाराच्या केसला हे परिपत्रक लागू होत नाही असे म्हणावे लागते आणि तक्रारदार यांनी घर बांधण्यासाठी नवीन वीज कनेक्शन घेतले आहे. सदर परिपत्रकानुसार विजेचा वापर ५०० युनिटस् प्रति महिना किंवा त्यापेक्षा कमी असला तरी त्यांना वेगळे स्वतंत्र तात्पुरते कनेक्शन घेण्याची गरज नाही आणि अशा ग्राहकांची बिलींग हे त्यांच्या सद्याच्या टॅरिफ प्रमाणेच केले जाईल. त्यामुळे तक्रारदाराची विनंती फेटाळणे योग्य होईल. मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे द्यावे लागेल.

प्रस्तुतची तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ९.६.२०१० रोजी घेण्यात आली. मंचासमोर दाखल केस क्र. ५९,६०/२०१०, ६१/२०१० कोल्हापूर, इचलकरंजी येथील प्रकरणे व सोलापूर येथील केस क्र. २०१/२००९, २२/२००९ तसेच उमा चॅरिटेबल ट्रस्ट, जत (केस क्र. ८०/२०१०) व डी.डी.एफ. ची प्रकरणे यामध्ये मंचाचा बराच वेळ गेल्याने सदरची तक्रार २ महिने मुदतीत निकाली काढणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष